International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

# जिल्हा परिषद अकोलाच्या विविध योजनांचे महिला सक्षमीकरणातील योगदानाचे अध्ययन

[1]उषा प्रभाकर पागृत, [2]डॉ. प्रा. टि. जी. मिरगे, [3]डॉ. प्रा. महेश डाबरे

[1]संशोधिका, [2]मार्गदर्शक
श्रीमती लक्ष्मीबाई राधाकिसन तोष्णीवाल, वाणिज्य महाविद्यालय, अकोला

**सारांश**

भारतामध्ये केंद्र सरकार व राज्य शासनामार्फत महिलांच्या सक्षमीकरणाकरीता विविध योजना राबविल्या जातात त्यामुळे महिला चांगल्या पध्दतीने स्वत:ची आर्थिक उन्नती करावी हा त्यामागील उददेश महिलांच्या आर्थिक सामाजीक धोरणाच्या दृष्टीने 1993 मध्ये महिला व बाल विकास विभागाची निर्मिती करण्यात आली- प्रस्तुत संशोधन संदर्भात झालेल्या विविध संशोधनाचा आढावा घेण्यासाठी प्रकाशित व अप्रकाशित शोध प्रबंध व संशोधनावर अभ्यास करण्यात येईल- शासकीय विविध अहवाल, पुस्तके, वृत्तपत्रे, माहीती पत्रके इत्यादिंच्या माध्यमातुन माहिती गोळा करण्यात येईल, सदर शोध लेखाचे लिखान व दुय्यम माहितीच्या आधारे करण्यात आलेले आहे- संशोधनामध्ये उत्तरदाते म्हणून यांची निवड केलेली आहे. 100 लाभार्थीकडून माहिती संकलित केलेली आहे-

**प्रस्तावना :**

महिला सक्षमिकरण हा आजच्या आधुनिक काळातील महत्वाचा विषय आहे- आपल्या प्राचीन ग्रंथामध्ये स्त्रियांना महत्वाचे स्थान असल्याचे आपल्याला दिसून येते की "यत्र नारायस्तु पुज्यन्ते तत्र देवता" म्हणजे जिथे स्त्रियांची पुजा केली जाते तेथे देवता वास करतात- स्त्री ही सृष्टीची शक्ती मानली जाते- म्हणजेच मानव जातीचे अस्तित्व स्त्रीपासून असे मानले जाते. महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांची सामाजीक आणि आर्थिक स्थिती सुधारते. जेणे करुन त्यांना रोजगार शिक्षण आर्थिक प्रगतीसाठी समान संधी मिळणे जेणे करुन त्यांना सामाजीक स्वातंत्र्य नविन संधी मिळतील. त्यामुळे स्त्रीया पुरुषांप्रमाणे त्यांच्या प्रत्येक आकांक्षा पुर्ण करु शकतील.

महाराष्ट्र शासनाने 1994 मध्ये पहिले तर 2001 मध्ये दुसरे तर 2014 मध्ये तिसरे महिला धोरण निश्चित केले आहे- या सर्व धोरणामध्ये महिलांच्या बाजुने कायदे केले गेले आहेत- यामध्ये स्त्रियांवरील अत्याचार, हिंसा, स्त्रीविषयक कायदे, त्यांच्या आर्थिक दर्जात सुधारणा, प्रसार माध्यमांची भुमिका, स्वयंसेवी संस्थांचा सहभाग, स्त्रियांना केंद्रस्थानी मानुन योजनांची निश्चिती, स्वयंसहायता बचत गटांचा विकास, मुद्रा योजना यांचा प्रामुख्याने विचार केला आहे. शासकीय निमशासकीय यंत्रनेमध्ये स्त्रियांना 30 टक्के आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना पन्नास टक्के आरक्षण महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातुन महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोती अभियानाच्या माध्यमातुन स्त्रियांना शिक्षण प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करुन दिल्या जातात.

महिला सक्षमीकरणामुळे महिलांना चांगले शिक्षण दिले जाणार आणि त्यांना प्रत्येक क्षेत्रात स्वतंत्रपणे निर्णय घेण्यास सक्षम बनविले जाईल. आधुनिक समाज महिलांच्या अधिकारांबद्दल अधिक जागरुक आहे. अनेक बचतगट आणि स्वयंसेवी संस्था इत्यादी या दिशेने काम करीत आहेत. बदलत्या काळानुसार आधुनिक युगातील स्त्री वाचण्यास आणि लिहीण्यास शिकल्या आहेत. त्यांना त्यांच्या अधिकाराची जाणीव आहे. त्या आपल्या परिवाराची जबाबदारी घेण्यास सक्षम आहेत. तसेच त्या स्वत:चे निर्णय स्वत: घेतात- ती सिमा भिंतीबाहेर येत आहेत आणि स्वत:चे व देशहिताचे महत्वाचे काम करतांना दिसत आहेत. आपल्या देशाच्या लोकसंख्येच्या जवळपास अर्ध्या महिला आहेत. म्हणून राष्ट्राच्या विकासाचे महान कार्य पुर्णत: आणि

योग्य दृष्टीकोनात महिलांची भुमिका आणि योगदान ठेवुनच राष्ट्र उभारणीचे ध्येय साध्य करता येते. शासनाने या योजना दोन गटात विभागल्या आहेत- पहिल्या गटात प्रशिक्षण आणि सक्षमीकरणाच्या योजना आहेत तर दुस-या गटात विविध वस्तु खरेदीच्या योजनांचा समावेश आहे.

**योजना**

अ. प्रशिक्षण आणि सक्षमीकरणाच्या योजना.

1. मुलींना व महिलांना व्यवसायीक व तांत्रीक प्रशिक्षण.
2. मुलींना स्वरक्षणासाठी व त्यांच्या शारिरीक विकासासाठी प्रशिक्षण.
3. महिलांसाठी समुपदेशन केंद्र.
4. इयत्ता 7 वी ते 12 वी पास मुलींना संगणक प्रशिक्षण.
5. तालुका स्तरावर शिकणा-या मुलींसाठी होस्टेल चालविणे.
6. किशोरवयीन मुलींना व महिलांना जेंडर आरोग्या, कुटुंब नियोजन, कायदेविषयक प्रशिक्षण.
7. अंगणवाडयांसाठी स्वतंत्र इमारत / भाडे.
8. बालवाडी व अंगणवाडी सेविका, मदतनिस, पर्यवेक्षिका यांना पुरस्कार देणे.
9. पंचायत महिला शक्ती अभियान अंतर्गत पंचायतराज संस्था मधील महिला लोकप्रतिनिधीना प्रशिक्षण व महिला मेळावे व मार्गदर्शन केंद्र.
10. बालवाडी व अंगणवाडी सेविका, मदतनिस, पर्यवेक्षिका यांचे प्रशिक्षण.
11. विशेष प्राविण्य मिळविलेल्या मुलींचा सत्कार.
12. महिला व बालकल्याण समिती सदस्यांचा दौरा.

एकुण प्रशिक्षणाच्या सक्षमीकरणाच्या एकुण 12 योजना आहेत. त्यापैकी निवडक दोन योजनांचे अध्ययन करण्यात आले आहे.

1. मुलींना व महिलांना व्यवसायीक व तांत्रीक प्रशिक्षण.
2. मुलींना स्वरक्षणासाठी व त्यांच्या शारिरीक विकासासाठी प्रशिक्षण.

केंद्र व राज्य शासनामार्फत राबविण्यात येणा-या विविध योजनांमुळे महिलांचे जीवन बदलत आहे. सदर शोध लेखाचे लिखाण प्राथमिक व दुय्यम महितीच्या आधारे करण्यात आलेले आहे. संशोधनामध्ये लाभार्थी दाते म्हणून ज्यांची निवड केलेली आहे असे 100 लाभार्थीकडून माहिती संकलित केलेली आहे. संशोधनाचा आढावा घेण्यासाठी प्रकाशित व अप्रकाशित शोध प्रबंध व शोध निबंधाचा अभ्यास करण्यात येईल. शासकीय विविध अहवाल, नियतकालीके, पुस्तके, वृत्तपत्रे, माहितीपत्रके इत्यादिच्या माध्यमातुन माहिती गोळा करण्यात येईल.

**संशोधन विषयाचे महत्व् :**

महिला कल्याणाशी संबंधित विविध कार्यक्रम राबविण्यासाठी सर्व जिल्हापरिषद महिला व बालकल्याण समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. या समितीने कार्यक्रम व योजना संदर्भधिन शासन निर्णयानुसार राबविण्यात येतात. महिला सक्षमीकरणाच्या योजना याचे अध्ययन करण्यात येणार आहे. संशोधन कालावधीमध्ये यांचा लाभ घेतलेले लाभार्थी यांना केंद्रस्थानी मानुन यांच्यामार्फत माहीती संकलित करण्यात येणार व त्याचे प्रस्तुतीकरण शोधप्रबंध यामध्ये केले जाईल. केंद्र व राज्याशासनाच्या मार्फत विविध कल्याणकारी योजना हया

राबविल्या जातात. राबविण्यात येणा-या विविध योजना याची माहीती प्राप्त करुन संशोधन कार्यातुन जनजागृती व्हावी हा उद्देश डोळयासमोर ठेवण्यात आलेला आहे.

संशोधनाची उद्दीष्टे :

1. महिलांच्या आर्थिक विकासासाठी असलेल्या योजनांची लाभार्थ्यांना कितपत माहीती आहे हे जाणुन घेणे.
2. अकोला जिल्हा परिषदेच्या योजनांमुळे महिलांच्या आर्थिक विकासात होणा-या बदलांचे अध्ययन करणे.

**संशोधन विषयाची गृहीतके**

1. लाभार्थ्यांना जिल्हा परिषदेच्या योजनांविषयी माहीती आहे.
2. जिल्हा परिषद राबवित असलेल्या योजनांमुळे महिलांच्या अर्थिक विकासात बदल झालेला दिसून येतो.

**पुर्व संशोधनाचा आढावा** :

संशोधनाचे कार्य करतांना संशोधनातील अत्यंत महत्वाचा टप्पा म्हणजे संशोधन विषयाशी संबंधित या आधी झालेले संशोधन याचा आढावा घेणे, या करीता महत्वाच्या साहित्याचा आढावा घेण्यात येणार आहे.

1. **कावरे कविता ज्ञानेश्वार** (2013)

"अकोला जिल्हयातील महिला व बालकल्याण विभागाची सरकारी कल्याणकारी योजनांच्या प्रभावाचे विश्लेषनात्मक अध्ययन.”

अकोला जिल्हयातील महिला व बालकल्याण विभागाव्दारे ज्या विविध योजना आहेत त्या योजनांचा महिला आणि बालकांच्या विकासावर कशा प्रकारे आर्थिक परिणाम झाला याचे अध्ययन केले आहे.

2. **काटोले प्रशांत** (2006)

“स्त्रीयांच्या आर्थिक विकासात विविध योजनांचे योगदान अमरावती जिल्हयाचे संदर्भात विशेष अध्ययन”.

स्त्रीयांच्या आर्थिक विकासात विविध योजनांचे योगदान अमरावती जिल्हयाचे संदर्भात विशेष अध्ययन यांनी अमरावती जिल्हयातील स्त्रीयांच्या आर्थिक विकासात ज्या विविध योजना आहेत त्यामुळे स्त्रीयांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा कशा प्रकारे झाली याचे अध्ययन केले आहे.

**गृहीत कृत्याची सिध्दता** :

1. आपणास जिल्हा परिषदेच्या योजनांविषयी माहीती आहे काय.

सारणी क्र. 1

| अनुक्रमांक | विवरण | उत्तरदात्यांची संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | होय | 82 | 82 |
| 2 | नाही | 18 | 18 |
| | एकुण | 100 | 100 |

वरील सारणीवरुन असे दिसून येते की, 82 प्रतिशत प्रमाण लाभार्थ्यांना जिल्हा परिषदेच्या योजनांविषयी माहिती आहे.

2. जिल्हा परिषद राबवित असलेल्या योजनांमुळे महिलांच्या आर्थिक विकासात बदल झालेला दिसून येतो.

सारणी क्र. 2

| अनुक्रमांक | विवरण | उत्तरदात्यांची संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | होय | 87 | 87 |
| 2 | नाही | 13 | 13 |
| | एकुण | 100 | 100 |

वरील सारणीवरुन असे दिसून येते की, जिल्हा परिषद राबवित असलेल्या योजनांच्या माध्यमातून जीवनातील बदल संदर्भात 87 प्रतिशत प्रमाण उत्तरदात्यांनी आपली सहमती दर्शविली आहे.

**संदर्भसुची :**

1. महिला धोरण 2001, महाराष्ट्र शासन 2001
2. श्री चंद्रसेन तुरकर – महिला सक्षमीकरण जाणीव व जागृती, यशमंथन यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी पुणे जानेवारी- मार्च 2002
3. के. उषा (Gender Equality and Development ) योजना मासिक 2003
4. मानव विकास अहवाल. महाराष्ट्र
5. मानव विकास अहवाल – 2007 (UNDP)